**ठळक बातम्या**

- विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यशासनाच्या आधारसामग्री डेटा धोरणाला मंत्रिमंडळाची मान्यता

- कर्नाटकात जाणाऱ्या एसटी बसगाड्यांचा सुरक्षा पुरवण्याचा शासनाचा विचार

**आणि**

- मुंबईसह कोकणात सर्व जिल्ह्यांमधे पुढचे तीन दिवस उष्णतेची तीव्र लाट येण्याचा हवामानविभागाचा इशारा

**<><><><><><>**

बदलत्या भूराजकीय आणि आर्थिक परिस्थितीत साऱ्या जगाचं लक्ष भारतावर केंद्रीत झालं असून विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ॲडवांटेज आसाम या गुंतवणूकदार संमेलनाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर आज गुवाहाटी इथं ते बोलत होते....

**होल्ड- बाईट- नरेंद्र मोदी-** ***दुनिया की नजरें भारत के निओ मिडलक्लासपर हैं.....***

कारखाना क्षेत्राची वाढ आणि रोजगारनिर्मिती याकरता आवश्यक पायाभूत सोयी सुविधा आणि उद्योगांना अनुकूल वातावरण देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

आसामचे राज्यपाल लक्ष्मणप्रसाद आचार्य, मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा, केंद्रीय मंत्री, सर्वानंद सोनोवाल, ज्योतिरादित्य शिंदे, इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला

उपस्थित होते. अदानी, रिलायन्स आणि टाटा या उद्योगसमूहांच्या प्रमुखांची भाषणं यावेळी झाली. उर्जानिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, अन्नप्रक्रीया, आतिथ्य, या क्षेत्रात तसंच स्थानिक कारागीरांच्या कौशल्याला वाव देणारी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी मोठी गुंतवणूक करण्याच्या घोषणा या उद्योजकांनी केल्या. दोन दिवसीय शिखर परिषदेत सात मंत्रीस्तरीय आणि १४ विषयाधारीत सत्रांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

एक देश एक निवडणूक संदर्भात स्थापन झालेल्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज नवी दिल्लीच्या संसद भवनात होत आहे. आज समिती कायदेविषयक तज्ज्ञांबरोबर चर्चा करत आहे. ३९ सदस्यांच्या या समितीत लोकसभेतले २७ तर राज्यसभेतले १२ खासदार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून पाच दिवस बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्या आज बिहारमध्ये पाटणा वैद्यकीय महाविद्यालयाच्या शताब्दी महोत्सवाला उपस्थित राहणार.

<><><><><>

केंद्र सरकारने अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्यक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती हिसकावून घेतली असल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी समाजमाध्यमावर पोस्टद्वारे केला. शिष्यवृत्ती बंद केल्यामुळे सरकारची ‘सब का साथ सब’ का विकास ही घोषणा या घटकांची थट्टा करणारी आहे, अशी टीका त्यांनी केली. शिवाय केंद्र सरकारनं शिक्षणासाठीची वार्षिक तरतूद २५ टक्के कमी केली असा आरोपही त्यांनी केला.

<><><><><>

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आकडेवारीवर आधारित विदा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय 'इनोव्हेट विथ गो आयस्टॅट्स' ही हॅकेथॉन आयोजित करत आहे. मायगोव्ह मंचावर ही स्पर्धा होणार असून त्यात सहभागासाठी आजपासून येत्या ३१ मार्चपर्यंत नोंदणी करता येईल. पदवी तसंच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी भाग घेऊ शकतील. सर्वोत्कृष्ट ३० स्पर्धकांना रोख पारितोषिकं देण्यात येतील. पहिलं पारितोषिक दोन लाख रुपयांचं असून दुसऱ्या क्रमांकाची दोन पारितोषिकं प्रत्येकी एक लाख रुपयाची असतील. तिसऱ्या क्रमांकाची दोन पारितोषिकं प्रत्येकी ५० हजार रुपयांची असतील तर प्रत्येकी २० हजार रुपयांची २५ उत्तेजनार्थ परितोषिकं देण्यात येतील, असं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

व्हेवज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटमधे कॉमिक क्रॉनिकल्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून स्पर्धकांना कॉमिक्स म्हणजे चित्रकथा बनवायच्या आहेत. या स्पर्धेसाठी आतापर्यंत ७७४ जणांनी नोंदणी केली आहे. वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आह. जगभरातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाचं लक्ष भारताकडे वेधणं हे या समिटचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><><>**

राज्यशासनाच्या आधारसामग्री डेटा धोरणाला मान्यता मिळाली असून त्या अनुषंगानं राज्य डेटा प्राधिकरणाची स्थापना करण्याचा तसंच. त्याकरता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती नेमण्याचा निर्णय राज्यमंत्रिमंडळाने आज मुंबईत झालेल्या बैठकीत घेतला. पुणे जिल्ह्यात पौड इथं दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायलयांची स्थापना करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पुणे जिल्ह्यात बारामती आणि

बीड जिल्ह्यात परळी इथं नवीन पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्यासाठीच्या तरतुदीला मान्यता देण्यात आली.  सार्वजनिक उपक्रम, किंवा महामंडळांना ठाणे जनता सहकारी बँकेत खाते उघडण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णयही आज झाला. तसंच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला  आजच्या बैठकीत मान्यता मिळाली.

**<><><><><><>**

एसटीच्या कर्मचाऱ्यांवर कर्नाटकात हल्ला झाल्याच्या पार्श्वभूमीवर या गाड्यांमधे सुरक्षा कर्मचारी तैनात करण्याचा शासनाचा विचार असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. पीटीआय वृत्तसंस्थेशी  ते बोलत होते. मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता असून प्रवाशांची सुरक्षा सर्वात महत्त्वाची असल्याचं ते म्हणाले. एसटीतल्या प्रवाशांची सुरक्षा ही कर्नाटक सरकारची देखील जबाबदारी असून त्यांनी ती पार पाडली नाही तर महाराष्ट्र सरकार सुरक्षा पुरवेल असं गृह राज्य मंत्री योगेश कदम यांनी सांगितलं.  राज्यपरिवहन महामंडळाच्या बसगाडीवर कर्नाटकात चित्रदुर्ग इथं गेल्या शनिवारी कन्नड समर्थकांनी हल्ला केला होता.  पुणे ते कर्नाटक 'एसटी' महामंडळाची बस सेवा गेल्या पाच दिवसांपासून बंद ठेवण्यात आली आहे. याचा फटका सीमावर्ती भागातील नागरिकांना बसत असून त्यांना विविध मार्गांनी प्रवास करावा लागत आहे.  दरम्यान, दोन्ही राज्यांच्या सीमेवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**<><><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करावी आणि फरार कृष्णा आंधळेला तत्काळ अटक करावी या मागणीसाठी ग्रामस्थांनी आजपासून दोन दिवसांच्या अन्नत्याग आंदोलनाला सुरूवात केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

<><><><><><>

राज्यात बंधुभाव आणि सामाजिक सौहार्द वाढीस लागावं यासाठी काँग्रेसने सद्भावना यात्रेचं आयोजन केल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं. ही यात्रा ८ मार्चपासून बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथून सुरू होईल. मुंबईत काँग्रेसच्या टिळक भवन मुख्यालयात ते काल वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><><>

नंदुरबारमधल्या शिवधाम उद्यानाचं उद्या महाशिवरात्रीच्या पर्वावर लोकार्पण होणार आहे. या शिवधाम उद्यानात राजस्थानहून आणलेली १६ फूट उंचीची शंकराची मूर्ती विराजमान असणार आहे. सोबतच बारा ज्योतीर्लींगांची प्रतिकृती देखील या उद्यानात उभारण्यात आली आहे.

<><><><><><>

महाशिवरात्रीनिमित्त उद्या अमरावती जिल्ह्यात सालबर्डी इथे भरणाऱ्या यात्रेच्या अनुषंगाने महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरच्या दारू अड्ड्यांवर छापे टाकण्यात आले. अमरावती पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि मध्य प्रदेश पोलिसांच्या पथकांनी काल संयुक्तरित्या ही कारवाई केली. या कारवाईत २७ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला.

<><><><><><>

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. पाकिस्तानमध्ये रावळपिंडी मैदानावर होणारा हा सामना पावसामुळं उशिरा सुरू होणार आहे.

<><><><><><>

मुंबईसह कोकणात सर्व जिल्ह्यांमधे पुढचे तीन दिवस उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. या परिसरात तापमान ३७

ते ३८ अंश सेल्सिअस पर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. त्यामुळे हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या वैज्ञानिक  सुषमा नायर यांनी सांगितलं…

**होल्ड बाईट नायर**

**//<><><><><><>//**